रेमुनं. १२७/२०१४

## नि. ४४ खालील आदेश

१ प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ नुसार वादीने प्रतिवादीच्या कबजे वहीवाटीस हरकत करु नये किंवा घर बांधू नये यासाठी मनाई मिळावी म्हणून दिला आहे. वादीने सदर अर्जास नि. ४७ कडे म्हणणे देवून सर्व कथनांचा इन्कार केला. दावा मिळकत वादीचे कबजे वहीवाटीत असल्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

२ दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांची पडताळणी केली. प्रस्तुत प्रकरणात माझे पुर्वअधिकारी यांनी नि. ५ कडील मनाई अर्ज मंजूर केलेला आहे. सदर अर्ज केवळ दावा मिळकत प्रतिवादीने हस्तांतरीत करु नये याबाबत होता. प्रतिवादीचे कथनानुसार दिनांक ३१/८/२०१६ रोजी वादीने त्याचे कबजे वहीवाटीस हरकत अडथळा केला परंतु त्यासाठी प्रथमदर्शनी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल करणेत आला नाही. सबब दावा मिळकत प्रतिवादीच्या कबजे वहीवाटीत आहे हे दाखवणारा प्रथमदर्शनी कागदोपत्रीपुरावा नसल्यामुळे तसेच वादीने हरकत अडथळा केला हे स्पष्ट होत नसल्यामुळे अर्ज नामंजूर होण्यास पात्र असून मी पुढील आदेश देत आहे :—

## आदेश

अर्ज नामंजूर करणेत आला.

दि. २१/९/२०१६

सुमित वि. जोशी
सह दिवाणी न्यायाधीश क. स्त., दौंड
जि. पुणे